


# कृष्णा एक्सप्रेस


संपादक - गोरख काशिनाथ तावरे





✼ कराड (जि.सातारा) ✼ वर्ष - २ रे. ✼ अंक २९१ वा. ✼ शनिवार दि.०५ जून २०२६ ✼ पृष्ठे ४ ✼ किंमत : १ रुपये ✼ RNI NO : MAHMAR/2024/86610

✼ Karad (Dis.Satara) ✼ Vol - 2 ✼ Ishue - 291 ✼ Friday 05 June 2026 ✼ Page - 4 ✼ Price - 1 Rs. ✼ RNI NO : MAHMAR/2024/86610


## पुनर्वसन धोरण नव्याने करणार; पाणीटंचाई निवारणार्थ उपाययोजनांना प्राधान्य द्या

### मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांचे मंत्रालयातील बैठकीत निर्देश

मुंबई : यंदा पाऊस कमी पडण्याची शक्यता लक्षात घेता पाणी टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे. तसेच, आपद्ग्रस्त शेतकऱ्यांचा 'ग्रीस्टॅक' डेटा तातडीने अपडेट करून, राज्यातील एकही पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही यासाठी गतीने ईकेवायसी तसेच ग्रीस्टॅक डाटा अपडेट करावा. राज्याचे पुनर्वसन धोरण सर्वसमावेशक व काळानुरूप करण्यासाठी नवे सुधारित धोरण जलदगतीने तयार करण्यात येईल, अशी ग्वाही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी आज येथे दिली.



मंत्रालयातील दालनात आयोजित मदत व पुनर्वसन विभागाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांच्यासह व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी उपस्थित होते. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले की, खरीप हंगाम २०२५-२०२६ मधील अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा 'ग्रीस्टॅक' डेटा सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी तपासावा. ज्या शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही, त्यांच्यासाठी विशेष कॅम्प (शिबिरे) आयोजित करून तातडीने मदत वितरित करावी.शेतकरी आत्महत्या प्रकरणांमधील प्रलंबित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करून ही प्रकरणे प्राधान्याने आणि तात्काळ निकाली लावावीत.यंदा पावसाचे कमी प्रमाण पाहता सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी दि. १५ ऑगस्टपर्यंतच्या पाणी वितरणाचे चोख नियोजन करावे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित कराव्यात. तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन आवश्यकतेनुसार चारा छावण्यांचे प्रस्ताव सादर करावेत.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले की, आपत्तीच्या काळात मनुष्यहानी, जखमी व्यक्ती, पशुहानी, घरगुती सामान (भांडी-कपडे), तसेच लहान दुकानदार व टपरीधारक यांना मिळणारी मदत स्थानिक प्रशासनाने शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे विहीत कालावधीत करावी.दरडप्रवण (दरड कोसळण्याचा धोका असलेली) गावांचे पुनर्वसन, सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पांमधील पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवणे आणि पूरग्रस्त भागातील गावांचे स्थलांतर यावर नवीन सुधारित धोरण लवकरच आणले जाईल.दि. १४ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयातील निकषांमध्ये बदल करून, रहिवाशांना देण्यात येणाऱ्या वाटपक्षेत्रात (जागेत) वाढ करणे, घरकुल अनुदानाच्या रक्कमेत भरघोस वाढ करणे आणि पुनर्वसन वसाहतींमध्ये आधुनिक सोयी-सुविधांचा समावेश करणे या बाबींचा या नव्या धोरणात प्रामुख्याने समावेश असेल.नवीन धोरण आणल्यानंतर पुनर्वसनाचे प्रस्ताव लोकप्रतिनिधींना विचारात घेऊन सुधारित सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

## कराडात १५ जूनला सामुदायिक इष्टलिंग पूजा व आशिर्वचन सोहळा

### सहा शिवाचार्यांची देखील प्रमुख उपस्थिती

कराड : कराड व परिसरातील भाविकांसाठी सोमवार, दि. १५ जून रोजी नवीन कृष्णामाई मंगल कार्यालयात सामुदायिक इष्टलिंग पूजेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता केदार जगद्गुरुंच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या पूजाविधीनंतर सर्व भाविकांना दर्शनाचा लाभ होणार आहे.यावेळी महाप्रसादाचे आयोजनही केले आहे.

सकाळी ८:३० वाजता केदार जगद्गुरुंचे आगमन होईल. सकाळी ९ वाजता सामुदायिक इष्टलिंग पूजा प्रारंभ होणार असून, सकाळी ११ वाजता पूजा विधी समारोप व आरती होईल. दुपारी १२ वाजता जगद्गुरुंचे आशीर्वचन होईल, तर दुपारी १ वाजता भाविकांसाठी दर्शन सोहळा प्रारंभ होईल. दुपारी १:३० वाजता महाप्रसाद सुरू होईल पूजेला बसण्यासाठी संयोजकांकडून ११११ रुपये देणगी निश्चित करण्यात आली आहे.

पूजेला बसणाऱ्यांना बेल, फुले व पूजा साहित्य कीट पुरविण्यात येणार आहे. मात्र, दाम्पत्याने येताना तांब्या, ताम्हण, पळी, पंचा सोबत आणावेत, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. या पूजाविधीदरम्यान जगद्गुरुंच्या हस्ते १००८ रुद्राक्षांचे वाटप भाविकांना करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वागताध्यक्ष राजू शेटे, कार्याध्यक्ष विनायक विभुते, अध्यक्ष अनिल खुंटाळे, उपाध्यक्ष आर.टी.स्वामी, शिवानंद डुबल, प्रा. प्रमोद सुकरे, संदीप मुंढेकर, सचिव दत्तात्रय तारळेकर, खजिनदार सुनिल महाजन, सहसचिव अमरनाथ कचरे, बंडा जोते यांचेसह संयोजन समितीचे सदस्य कार्यरत आहेत. तरी जास्तीत जास्त भाविकांनी या पूजेचा व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीने केले आहे.




**सदरचा धार्मिक कार्यक्रम कराडच्या प्रीतिसंगमा नजीक असलेल्या मंगल कार्यालयात होत आहे. विशेष म्हणजे १५ जून दिवशी अधिक मासाची सांगता होत आहे.योगायोगाने सोमवार व अमावस्या आहे.अन् केदार जगद्गुरुंच्या सानिध्यात सामुदायिक इष्टलिंग पूजा व त्यांच्या दर्शनाचा लाभ सर्वांना मिळणार आहे.**

## 'अजिंक्यतारा'च्या वतीने पर्यावरण पूरक ऊस व्यवस्थापन शेतकरी चर्चासत्र

सातारा - अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना शाहूनगर शेंद्रे, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सातारा आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ शासकीय कृषी महाविद्यालय पुणे यांच्या संयुक्त विदमाने पर्यावरण पूरक ऊस व्यवस्थापन प्रकल्प प्रक्षेत्र भेट व शेतकरी चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले. अजिंक्यतारा कारखाना कार्यक्षेत्रात सातारा तालुक्यातील वनगळ, आरळे, गोजेगाव, नागठाणे, अतीत, वर्णे आणि निगडी वंदन या ठिकाणी शेतकरी चर्चासत्र व प्रक्षेत्र भेट कार्यक्रमझाला असून त्याद्वारे पर्यावरण पूरक ऊस व्यवस्थापन याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.





चर्चासत्रात शासकीय कृषी महाविद्यालय पुणेचे सहयोगी प्राध्यापक तथा प्रकल्प समन्वयक धर्मेंद्र कुमार फाळके यांनी खोडवा ऊस पीक व्यवस्थापन याबाबत माहिती दिली. खोडवा पिकात पाचट ठेवणे आवश्यक असून त्यामुळे जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढतो.

जमिनीची पूर्व मशागत करताना सबसॉयलरचा वापर करण्याचा सल्ला देत त्यांनी त्याचे फायदे सांगितले. त्याचप्रमाणे ऊस बियाणे निवड प्रक्रियेबाबतही मार्गदर्शन केले. शेतकरी बांधवांनी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथील मूलभूत ऊस बियाण्याचा वापर करावा असे त्यांनी सांगितले.

ऊस रोपाची लागण करणे फायदेशीर असल्याचेही ते म्हणाले. यासाठी शेतकऱ्यांनी प्रमाणित ऊस नर्सरीतून बियाणे खरेदी करावे. खोडवा पिकात आंतरपिके घेणे उदाहरणार्थ कलिंगड, खरबूज आदी, यामुळे उत्पादन खर्च निघतो व नफा शिल्लक राहतो. पूर्व हंगामी ऊस लागवड व त्याचे फायदे, हिरवळीच्या खतांचा, ताग वापर याबाबत माहिती दिली. याप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते, ऊस विकास विभागातील कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

## संघ प्रचारक निलेश अहिरे यांचे निधन



कराड : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कराड उत्तर तालुक्याचे प्रचारक निलेश अहिरे (वय २३) यांचे निधन झाले. मूळचे मालेगाव तालुक्यातील वडेल गावचे स्वयंसेवक असलेल्या निलेश यांच्या पश्चात आई, वडील आणि तीन बहिणी असा परिवार आहे. निलेश अहिरे यांना बुधवारी (३ जून) हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता. त्यानंतर त्यांना तातडीने 'श्री' रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारांपूर्वीच त्यांची प्राणज्योत मावळली होती. रात्री उशिरा त्यांचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी मालेगावकडे रवाना करण्यात आला, अशी माहिती कराड उत्तर तालुका कार्यवाह प्रसाद पवार यांनी दिली. अगदी कमी कालावधीत सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणाऱ्या निलेश यांच्या जाण्याने संघ परिवारासह सर्व स्तरांतून तीव्र शोक व्यक्त होत आहे. श्रद्धांजली अर्पण करताना जिल्हा संघचालक डॉ. मकरंद बर्वे म्हणाले, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर निलेशजींनी राष्ट्रकार्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. त्यांच्यासारखा एक कर्तव्यनिष्ठ आणि राष्ट्रसमर्पित कार्यकर्ता गमावल्यामुळे आम्हाला मोठा धक्का बसला आहे. हे दुःख पचवण्याची शक्ती ईश्वर त्यांच्या कुटुंबीयांना देवो, हीच प्रार्थना. निलेश यांच्या आकस्मिक निधनामुळे मालेगाव तालुक्यातही शोककळा पसरली आहे.

## कराडमधील खाजगी रुग्णालयांतील मेडिकल सक्तीवर कारवाईची मागणी

कराड : कराड शहरातील खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा गंभीर आरोप करत सामाजिक कार्यकर्ते गणेश प्रल्हाद पवार यांनी राज्य प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, शहरातील अनेक खाजगी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांनी स्वतःची मेडिकल दुकाने सुरू केली असून, रुग्णांना बाहेरील मेडिकलमधून औषधे खरेदी करण्यास अडथळे निर्माण केले जात आहेत. तसेच काही रुग्णालयांमध्ये एमआरपी दराने औषधे विक्री करून कोणतीही सवलत दिली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. बाहेरील मेडिकल दुकानांमध्ये औषधांवर १५ ते २० टक्के सवलत मिळत असताना, रुग्णालयातील मेडिकलमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांना अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काही ठिकाणी ठराविक कंपनीची औषधे घेण्याचा आग्रह धरला जात असल्याने रुग्णांच्या खर्चात मोठी वाढ होत असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर गणेश प्रल्हाद पवार यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी सातारा, प्रांताधिकारी कराड आणि तहसीलदार कराड यांना निवेदन देत विशेष तपासणी मोहीम राबवण्याची मागणी केली आहे. निवेदनात पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. रुग्णालयांमध्ये औषध विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी संयुक्त तपासणी पथक नेमावे, रुग्णांना बाहेरील परवानाधारक मेडिकलमधून औषधे घेण्याचे स्वातंत्र्य द्यावे, तसेच एमआरपीपेक्षा अधिक दराने विक्री किंवा सक्तीच्या खरेदीवर बंदी घालावी.

याशिवाय नियमभंग करणाऱ्या रुग्णालयांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या प्रकरणाची दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. या प्रकारामुळे कराड शहरातील आरोग्यसेवा आणि औषध विक्री पद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## यदुभाऊ जोशी यांचा सत्कार




महाराष्ट्र शासन वृत्तपत्र व प्रसार माध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदुभाऊ जोशी यांचा सत्कार करताना पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरीष पाटणे, सदस्य गोरख तावरे, चंद्रसेन जाधव, संचालक गणेश मुळे, गोविंद अहंकारी उपसंचालक किरण मोघे.

## सांगली-सातारा विधान परिषद निवडणुकीत तिहेरी लढत; माघारीनंतर चित्र स्पष्ट

सांगली/सातारा : महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील २०२६ ची निवडणूक सांगली-सातारा मतदारसंघात आता निर्णायक टप्प्यात पोहोचली असून, अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर निवडणूक लढतीचे अंतिम चित्र स्पष्ट झाले आहे.

काही उमेदवारांनी माघार घेतल्याने स्पर्धा अधिक केंद्रित आणि चुरशीची बनली आहे. अर्ज माघार घेतलेल्या उमेदवारांमध्ये तानाजी भगवान पाटील, प्रताप धोंडीराम पाटील, मयुर बाबासो पाटील आणि संजय नायकू मेंढे यांचा समावेश आहे. या माघारीमुळे राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता असून, विविध गटांमध्ये नव्याने रणनीती आखली जात आहे.

आता या मतदारसंघात मुख्य लढत (भारतीय जनता पक्ष), आणि अपक्ष उमेदवार यांच्यात होणार आहे. भाजपचे उमेदवार धैर्यशील कदम यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कार्यकर्त्यांच्या बळावर प्रचाराला गती दिली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) कडून अभयसिंह जगताप हे संघटनात्मक पाठबळाच्या जोरावर मतदारांशी संपर्क वाढवत आहेत. अपक्ष उमेदवार किशोर धुमाळ यांनीही वैयक्तिक जनसंपर्क आणि स्थानिक पातळीवरील ओळखीच्या जोरावर निवडणुकीत चुरस निर्माण केली आहे.

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ असल्याने जिल्हा परिषद, नगरपालिका आणि इतर स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी या निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावणार आहेत. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराकडून मतदारांशी थेट संवाद साधण्यावर आणि गटबांधणी मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, माघारीनंतर तयार झालेली ही तिहेरी लढत अत्यंत चुरशीची ठरणार असून, अंतिम निकाल स्थानिक राजकीय गणिते, पक्षीय ताकद आणि वैयक्तिक संपर्क यावर अवलंबून असेल. आगामी दिवसांत प्रचाराला आणखी वेग येण्याची शक्यता आहे.

## 'कृष्णा'च्या निवडणुकीतून पाच जणांची माघार

कराड : यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळ निवडणुकीत उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या प्रक्रियेत गुरुवारी पाच उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणातील उमेदवारांची संख्या १०७ वर आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अपर्णा यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, काले - कार्वे व्यक्तिगत ऊस उत्पादक गट क्रमांक २ मधून विश्वनाथ नारायण थोरात (रा. कार्वे), रेठरे हरणाक्ष - बोरगाव गट क्रमांक ४ मधून संग्राम जयकर शिंदे (रा. बोरगाव), येडेमच्छिंद्र - वांगी गट क्रमांक ५ मधून विश्वनाथ जगन्नाथ पाटील (रा. येडेमच्छिंद्र) यांनी प्रत्येकी एक व याच गटातून आत्माराम बापू शिंदे (रा. देवराष्ट्रे) यांनी आपले दोन उमेदवारी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे एकूण उमेदवारांची संख्या १०८ वर आली आहे. दरम्यान, उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी मंगळवार, दि. ९ जून ही अंतिम मुदत अजून ५ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे.

## गोडावन पक्षाला आता 'झेड प्लस' सुरक्षा

नवी दिल्ली : हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर ग्रेट इंडियन बस्टर्ड अर्थात गोडावण या पक्ष्याची स्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघटना(आययूसीएन) ने त्याची नोंद 'अत्यंत संकटग्रस्त' प्रजाती म्हणून केली आहे. हा दुर्मिळ पक्षी भारत आणि पाकिस्तानच्या सीमावर्ती भागांत आढळतो.

## संपादकीय....

# घोटाळ्याची धग

सातारा जिल्हा परिषदेत कथित वाहन घोटाळ्याच्या मुद्द्यावरून जिल्ह्यातील राजकारण चांगलेच तापले असून, या प्रकरणाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारातील पारदर्शकतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सामाजिक कार्यकर्ते राजू शेळके यांनी या प्रकरणात सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप करत उच्चस्तरीय चौकशीची मागणी केल्यानंतर प्रशासन आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. सार्वजनिक निधीचा वापर, वाहन खरेदीतील प्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका यावर आता व्यापक चर्चा सुरू झाली आहे.जिल्हा परिषद ही ग्रामीण विकासाची प्रमुख यंत्रणा मानली जाते. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, महिला व बालकल्याण यांसारख्या मूलभूत योजनांची जबाबदारी या संस्थेवर असते. अशा परिस्थितीत वाहन खरेदीसारख्या बाबतीत जर अनियमितता झाल्याचा संशय निर्माण होत असेल, तर तो केवळ आर्थिक गैरव्यवहाराचा मुद्दा राहत नाही; तर तो जनतेच्या विश्वासाशी संबंधित प्रश्न बनतो. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. राजू शेळके यांनी केलेल्या आरोपांमध्ये वाहन खरेदी प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन, आर्थिक नुकसान आणि काही अधिकाऱ्यांना दिलेले कथित संरक्षण यांचा उल्लेख करण्यात आला आहे. या आरोपांमध्ये कितपत तथ्य आहे, हे चौकशीनंतरच स्पष्ट होईल. मात्र, आरोप होताच केवळ राजकीय बचावात्मक भूमिका घेण्यापेक्षा सत्ताधाऱ्यांनी पारदर्शकतेची भूमिका स्वीकारणे अधिक गरजेचे आहे. विरोधकांकडून होणाऱ्या प्रत्येक आरोपाला राजकीय स्टंट म्हणून नाकारण्याची प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक ठरू शकते.गेल्या काही वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विविध आर्थिक गैरव्यवहारांच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. काही प्रकरणांमध्ये चौकशा सुरू झाल्या, काही ठिकाणी कारवाईही झाली; मात्र अनेक वेळा प्रकरणे राजकीय दबावाखाली दडपली गेल्याची भावना जनमानसात आहे. त्यामुळेच सातारा जिल्हा परिषद वाहन प्रकरणाची चौकशी निष्पक्ष आणि वेळेत होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा चौकशी हा शब्द केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहील.या प्रकरणातून प्रशासनानेही धडा घेण्याची गरज आहे. शासकीय खरेदी प्रक्रियेत ई-निविदा प्रणाली, तांत्रिक पडताळणी आणि सार्वजनिक माहितीचा अधिकार यांची काटेकोर अंमलबजावणी झाली, तर अशा वादांना मोठ्या प्रमाणात आळा बसू शकतो. जनतेच्या पैशातून होणाऱ्या प्रत्येक खर्चाचा हिशेब देण्याची जबाबदारी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर समानपणे आहे. सातारा जिल्हा परिषद वाहन प्रकरण आता केवळ आरोप-प्रत्यारोपांपुरते मर्यादित राहिलेले नाही. या निमित्ताने ग्रामीण प्रशासनातील उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि नैतिकतेची कसोटी लागणार आहे. राज्य शासनाने या प्रकरणात निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली, तर जनतेचा विश्वास दृढ होईल. अन्यथा भ्रष्टाचाराविरोधातील घोषणा आणि प्रत्यक्ष कृती यातील दरी अधिकच वाढत जाईल.

## आनंदराज आंबेडकर यांचा सत्कार!



सातारा : रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी,बौद्धजन पंचायत समितीचे सभापती व हिंदू मिलचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त राजगृह या ठिकाणी सत्कार करण्यात आला. रमाबाई आंबेडकर नगर वार्ड शाखा १३३ चे अध्यक्ष,माता रमाई स्मारक ट्रस्टचे संचालक तसेच शाखेचे क्रियाशील संघटक नथु कांबळे, मनोज जाधव व शाखेचे सरचिटणीस तानाजी साबळे आदी मान्यरांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी मिठाईचे वाटप करण्यात आले.

## मिरज तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी सदस्य पदांचे प्रभागनिहाय आरक्षणाची १२ जूनला सोडत

सांगली : मिरज तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी सदस्य पदांची प्रभागनिहाय आरक्षण सोडत शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजल्यापासून संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जाहीर विशेष ग्रामसभेत काढण्यात येणार आहे. तरी संबंधित १७ गावांतील सर्व ग्रामस्थांनी संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा तहसिलदार डॉ. अपर्णा मोरे-धुमाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. मिरज तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी सदस्य पदांचे आरक्षण निश्चितीची अधिकृत प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २५ मे २०२६ रोजीच्या ग्रामपंचायत (बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट) सार्वत्रिक निवडणूक आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आदेश, २०२६ मधील कायदेशीर तरतुदींनुसार मिरज तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींमधील सदस्य पदांची प्रभागनिहाय आरक्षण सोडत शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजल्यापासून संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जाहीर विशेष ग्रामसभेत काढण्यात येणार आहे. आरक्षण सोडत होणाऱ्या ग्रामपंचायती पुढीलप्रमाणे १) मल्लेवाडी, २) लक्ष्मीवाडी, ३) लिंगनूर, ४) विजयनगर, ५) भोसे, ६) एरंडोली, ७) डोंगरवाडी. ८) शिपूर, ९) चाबुकस्वारवाडी, १०) कवलापूर, ११) आरग, १२) कळंबी, १३) तानंग, १४) मालगांव, १५) शिंदेवाडी, १६) म्हैसाळ (एस), १७) ढवळी. सदर आरक्षण सोडतीमध्ये विहित कार्यपद्धतीनुसार अनुसूचित जाती (डउ), अनुसूचित जमाती (डढ), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (जइउ) आणि महिलांसाठी (सर्व प्रवर्गातील ५०% महिला आरक्षणासह) जागांचे प्रभागनिहाय आरक्षण निश्चित केले जाईल. आयोगाच्या नियमांनुसार ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने, पारदर्शक डब्यातून प्राथमिक शाळेतील मुलांकडून जाहीर चिठ्ठ्या टाकून, स्थानिक नागरिकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत पार पडणार आहे.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया!

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन,




मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे.

याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मँग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत.

'जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते.जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे.पर्यटनाला जाताना सोबत 'सीडबॉल ' घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे.मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन,जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.

**- प्रवीण टाके,** उपसंचालक
- विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर - मो.९७०२८५८७७७

# मुंबईत शिवोत्सव आणि ३५३ वा राज्याभिषेक सोहळा

**(रवींद्र मालुसरे)**

मुंबई : शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी अध्याय आहेत, आपल्या महान कार्याने आणि लोककल्याणकारी धोरणांनी त्यांना जगाच्या इतिहासात अढळ स्थान मिळाले आहे. त्यांचा इतिहास भारतातील इतर राज्यातील भाषांतून पोहोचावा याहेतूने श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल या संस्थेच्या वतीने ७ जून रोजी संध्याकाळी ५.०० वाजता दादर पश्चिम येथील धुरु हॉलमध्ये ३५३ वा राज्याभिषेक सोहळाशिवोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

या विनामूल्य कार्यक्रमास शिवप्रेमीनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे संस्थापक डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कृषी अर्थ तज्ज्ञ, केंद्रीय नियोजन आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आणि मुक्तपीठचे संपादक श्री. तुळशीदास भोईटे, शिवराजाभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड समितीचे अध्यक्ष श्री. सुनील पवार, मुंबई बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. संदीप सुर्वे, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष श्री. रवींद्र मालुसरे हे असणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार वेगवेगळ्या माध्यमात सातत्याने कार्यरत राहून जनमानसात पोहोचविणारे सर्वश्री



सुप्रसिद्ध मल्लखांब प्रशिक्षक पद्मश्री श्री.उदय देशपांडे, सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक, दुर्गसंवर्धक श्री. श्रमिक गोजमगुंडे, शिवचरित्रांची शेकडो पुस्तके आणि दुर्मिळ नाणी आणि वस्तूंचे संग्राहक श्री. राजा जाधव, हुतात्मा स्मारक समिती प्रमुख, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक श्री. भाऊ सावंत, शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड समितीचे जनसंपर्क प्रमुख श्री. रंजन गावडे, मराठाकालीन शस्त्रात्रांचे कलात्मक प्रतिकृती निर्माते रुद्र आर्टचे श्री. सत्यजित वैद्य यांना यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे.

डॉ हेमंतराजे गायकवाड लिखित शिवाजी महाराज द ग्रेटेस्ट या मोडी लिपी आवृत्ती पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. यापूर्वी हे पुस्तक इंग्रजी, मराठी, हिंदी आणि कन्नड भाषेत प्रकाशित झाले आहे. ह्या पुस्तकाचे मोडी लिपी तज्ज्ञ, लिप्यंतरकार आणि ज्येष्ठ अभ्यासक सर्वश्री रामकृष्ण बुटेपाटील, भाऊ घाडीगावकर, अरविंद कटकधोंड, डॉ. राहुल सारडा, डॉ. तेजस लोखंडे, राम वाघोले, चंद्रशेखर पालव, प्रसाद सुतार, रोहिदास राऊत, तेजस्विनी भावे यांनी आपल्या सुवाच्य अक्षरात मोडी लिपीत लिप्यंतर केले आहे.

या सर्वांना शिवकार्याविषयी त्यांच्या ठायी ममत्व असल्यामुळे ठरलेल्या वेळेपूर्वी त्यांनी हे काम पूर्ण केले आहे. त्याप्रित्यर्थ त्यांना बाळाजी आवजी चिटणीस सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कुमारी ऋतुजा भोसले, कुमार आरंभ गायकवाड, कुमार अरिहंत जाधव हे शिवबावनी सादरीकरण करणार आहेत. त्याचे गद्य भाषेत सूत्रसंचालन श्री समीर वारेकर आणि प्रा. श्रीमती वर्षा भोसले करणार आहेत.

# महाराष्ट्र लोकभवन येथे तेलंगणा राज्य स्थापना दिन साजरा

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. ३ जून) महाराष्ट्र लोकभवन येथे तेलंगणा राज्याचा स्थापना दिवस सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम 'लोकभवन' मुंबई येथे 'वर्मा फाउंडेशन' आणि 'फेडरेशन ऑफ तेलगू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' यांच्या सहकार्याने आयोजित केला होता. यावेळी संस्थेतील काही कलाकारांनी तेलंगणा राज्याची लोकगीते व लोकनृत्ये सादर केली. यावेळी कलाकारांनी तेलंगणा राज्याचे पारंपरिक गीत 'जय जय हे तेलंगणा', 'आंदे श्री' तसेच 'वंदे शिवम शंकरम' ही गीते सादर केली. यावेळी तेलंगणाचे राज्यपाल श्री शिव प्रताप शुक्ला यांचा व्हिडिओ संदेश देखील दाखविण्यात आला.

कलाकारांनी रंगीबेरंगी 'बथुकम्मा', 'बोनालू' आणि इतर पारंपरिक नृत्यप्रकारांनी तेलंगणाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे सुंदर दर्शन घडविले असे राज्यपालांनी आपल्या भाषणात सांगितले. 'वर्मा फाउंडेशन' आणि 'फेडरेशन ऑफ तेलगू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' यांच्या कलाकारांनी सादर केलेल्या उत्कृष्ट सांस्कृतिक सादरीकरणाबद्दल राज्यपालांनी त्यांचे अभिनंदन केले.

नाट्य शिरोमणी शेख नादिया यांचे सादरीकरण विशेष उल्लेखनीय होते. त्यांच्या कलात्मकतेने आणि भावपूर्ण अभिनयाने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले असे देखील राज्यपालांनी आपल्या भाषणात म्हटले. भारत सरकारच्या 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून तेलंगणा राज्य स्थापना दिवस लोकभवन येथे आयोजित करण्यात आला होता.

भारतातील प्रत्येक राज्याची वेशभूषा, भाषा, नृत्य व खाद्य संस्कृती वेगळी आहे. संपूर्ण देश फुलांच्या हाराप्रमाणे एका सांस्कृतिक धाग्याने बांधला गेला आहे.

# आज पर्यावरण दिनानिमित्त साताऱ्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन!

सातारा : विकास हवाच, वृक्षतोड नकोच... या न्यायाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शुक्रवार दि.५ रोजी सातारा व परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ वा.कुरनेश्वर मॉर्निंग ग्रूपतर्फे सकाळी ७ वा.वृक्षारोपण विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. अशी माहिती अध्यक्ष डॉ.सतीश भोसले, कार्याध्यक्ष उमेश खंडखोडे, उपाध्यक्ष अनिल वीर आदी पदाधिकारी व सदस्यांनी दिली. सायंकाळी ५ वा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर ते राजवाडा या दरम्यान दिंडीचे आयोजन केले आहे.नागरिक व प्रशासकीय अधिकारी यांचा एकत्रीत सहभाग आहे.तेव्हा विविध क्षेत्रातील




मान्यवर,कलाकार आदी उपस्थित राहणार आहेत. तेव्हा पर्यावरण प्रेमींनी मोठ्या संख्येनी उपस्थित रहावे.असे आवाहन समस्त वृक्षप्रेमी सातारकर यांच्यावतीने सिने कलाकार सयाजी शिंदे यांनी केले आहे.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ❊ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

दैनिक
कृष्णा एक्सप्रेस
KRISHNA EXPRESS

DAILY KRISHNA EXPRESS

शुक्रवार दि.०५ जून २०२६



# कॉ.काकाजी कदम ग्रंथालयास पुस्तक भेट द्यावी




सातारा : कॉम्रेड काकाजी कदम यांच्या स्मृतिदिनानिमित्त मान्यवरांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. एक वर्षांपूर्वी त्यांच्या नावाच्या वाचनालयला पुस्तके देण्याचे जाहीर केले होते. एक वर्ष पूर्ण झाले असून इच्छुकांनी काही पुस्तके कॉ. विनय आफळे, कॉ. आनंद साठे,कॉ. उल्हास पुराणिक, श्रीकांत कांबळे यापैकी एकाकडे जमा करावीत. सदरची पुस्तके कॉ. काकाजी कदम ग्रंथालयास भेट देण्यात येणार आहेत.

# ‘अंतर्मनीचे भाव तरंग’ ई-काव्यसंग्रहाचे प्रकाशन

पुनावळे : ज्येष्ठ साहित्यिक बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर यांच्या लग्नाच्या ४४ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या ‘अंतर्मनीचे भाव तरंग’ या पहिल्या ई-काव्यसंग्रहाचे प्रकाशन बुधवारी घरगुती वातावरणात संपन्न झाले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुनावळे येथील अनिका पिर्कॅडिली सोसायटीतील त्यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम पार पडला.



कार्यक्रमाला पत्नी माधुरी डिसोजा, पुत्र डॉ. अभिनंदन डिसोजा, डॉ. साईप्रसाद डिसोजा, स्नुषा सुप्रिया डिसोजा, पूजा डिसोजा तसेच नातवंडे हेरंब आणि इरा उपस्थित होते. प्रा. डॉ. धनंजय भिसे यांनी ई-काव्यसंग्रहाचे प्रकाशन करून पुस्तकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. दौंड येथे २१ ऑक्टोबर १९५५ रोजी जन्मलेल्या बाबू कुमठेकर यांनी बँकिंग क्षेत्रात शाखा व्यवस्थापक म्हणून काम करत असतानाच साहित्यसेवा अखंड सुरू ठेवली. कवितालेखन, स्तंभलेखन आणि मुक्त पत्रकारिता या क्षेत्रांत त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ‘शब्दझुला’, ‘आवर्त’, ‘आशय’ आणि ‘अस्वस्थ वर्तमानातील मी’ या त्यांच्या साहित्यकृतींना वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.


‘अंतर्मनीचे भाव तरंग’ या ई-काव्यसंग्रहात सुमारे ऐंशी कविता असून प्रेम, माणुसकी, निसर्ग, अध्यात्म, सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम, भाषा-अस्मिता आणि मानवी मूल्यांचा वेध घेण्यात आला आहे. ‘दातृत्व’, ‘देशप्रेमी क्रांतीकारक’, ‘धर्म लेखणीचा’, ‘भाषा संस्कार’ आणि ‘बसवण्णा’ यांसारख्या कवितांमधून सामाजिक परिवर्तन, मानवतावादी दृष्टिकोन आणि वैचारिक भूमिका मांडण्यात आली आहे. प्रा. डॉ. धनंजय भिसे यांनी सांगितले की, हा काव्यसंग्रह संवेदनशील मनातील भावनांचा आणि जीवनानुभवांचा शब्दरूप आविष्कार आहे. साधी, सहज आणि हृदयस्पर्शी भाषा हे या कवितांचे वैशिष्ट्य असून त्या वाचकाला विचार करायला भाग पाडतात. साहित्य हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरू शकते, हे या कवितांमधून प्रकर्षाने जाणवते, असेही त्यांनी नमूद केले.

मुख्याध्यापक संतोष काळे यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, ४४ वर्षांच्या सहजीवनाचा अनुभव आणि संवेदनशील मनातील विचारांचा प्रवाह या ई-काव्यसंग्रहातून व्यक्त झाला आहे. निवृत्तीनंतरही बाबू डिसोजा समाजप्रबोधनाचे कार्य लेखणीच्या माध्यमातून सातत्याने करत आहेत. नव्या पिढीसाठी ते प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. बाबू कुमठेकर यांच्या साहित्यकृतींना संगीतविश्वातूनही दाद मिळाली आहे. त्यांच्या गीतांना चारुशीला बेलसरे आणि रविंद्र साठे यांसारख्या नामवंत कलाकारांनी स्वर दिले आहेत. त्यांच्या भक्तिगीतांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांत लोकप्रियता मिळवली आहे. मराठी काव्यसाहित्यात मोलाची भर घालणारा ‘अंतर्मनीचे भाव तरंग’ हा ई-काव्यसंग्रह वाचकांना संवेदनशीलता, सामाजिक भान आणि सकारात्मक जीवनदृष्टी देणारा ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त अभिवादन

सातारा : राजवाडा परिसरात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राजवाडा व जवळच असणाऱ्या नगर वाचनालयातही प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी साहित्यिक डॉ.राजेंद्र माने यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर प्रकाशझोत टाकला.यावेळी कर्मचारी, वाचक,पत्रकार व नागरिक उपस्थित होते.



वाचनालयाच्या परिसरात आजी माजी नगरसेवक, विविध संस्थाचे पदाधिकारी यांच्यासह बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर,महेंद्र एकळ,ॲड. विलास वहागावकर, सागर ढेबे,राजू निवळे, सचिन जांगळे, प्रमोद ढेबे,प्रशांत ढेबे,राकेश जांगळे,बाबू देवरखे,किसन कोकरे, पार्थ जांगळे, शंकर खरात आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.शहरात सवाद्य अशी मिरवणूक काढण्यात आली.खास आकर्षण असलेला पारंपारिक गजा खेळ पाहण्यात नागरिक मशगुल होती.

त्यामध्ये ढोल वाजवणारा तरुण ठेक्यावर नाचत असल्याने त्याच्याकडेच बघ्यांच्या नजरा खेळल्या होत्या.

# समृद्धी कोळी यांनी केला साई म्हात्रेचा गौरव

**(महेंद्र माने)**

नागोठणे : रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा, पिगोंडे येथील इयत्ता ७ वीचा विद्यार्थी रायझिंग स्टार साई योगेश म्हात्रे याची गुरुकुल एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेतून भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) भेटीसाठी निवड झालेली आहे. त्याच्या या यशाबद्दल रोहा पंचायत समिती सदस्या समृद्धी संतोष कोळी व माजी सरपंच संतोष कोळी यांनी साई म्हात्रेचा शाल, श्रीफळ व रोख पाच हजार रुपये देऊन गौरव केला आहे.

तसेच ग्रामपंचायतच्या वतीनेही साई म्हात्रे याचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह व रोख हजार रुपये देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी



मुख्याध्यापक कमलाकर लेंडी,शिक्षक सोनल पाटील यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी वृंद व ग्रामस्थ उपस्थित होते.

कोल्हापूर येथील गुरुकुल एज्युकेशन सोसायटी ही संस्था इयत्ता ०१ ली ते ०८ वीपर्यंत मराठी, सेमी इंग्लिश, इंग्लिश व उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी २०११ पासून स्पर्धा परीक्षा आयोजित करत आहे.रायगड जिल्ह्यात अशोक अहिरे यांच्या देखरेखीखाली ही परीक्षा घेण्यात आली होती. रायगड जिल्ह्यातून या परीक्षेत ३,६१७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.यामध्ये साई म्हात्रे यांनी यश संपादित केल्यानंतर बुधवार ०३ जून रोजी पिंगोडे ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या एका छोटेखानी गौरव समारंभात समृद्धी कोळी यांनी आपल्या मनोगतात साई म्हात्रे याने चांगले यश संपादन केले आहे. इस्रो ही भारताची प्रमुख राष्ट्रीय अंतराळ संस्था आहे. ही संस्था देशाच्या विकासासाठी अंतराळ तंत्रज्ञानाचा वापर करणे, उपग्रहांची निर्मिती आणि प्रक्षेपण करणे व अवकाश संशोधन करणे ही इस्रोची मुख्य कामे असून ही संस्था उपग्रह प्रक्षेपण, दळणवळण, हवामान अंदाज व पृथ्वीवरील साधन संपत्तीचा अभ्यास करण्यासाठी विविध उपग्रह अंतराळात पाठवते.अशा अनेक तंत्रज्ञानाची माहिती त्यांना त्या ठिकाणी अवगत होणार असल्याने याचा पुरेपूर साई म्हात्रे याने लाभ घ्यावा; असे सांगून पुढील कार्यासाठी साई म्हात्रे शुभेच्छा दिल्या.

# आंबेनळी अपघातात मृत्युमुखी पडलेल्याच्या घरी सांत्वनपर भेटी-गाठी



सातारा : आंबेनळी घाटातील अपघातात मृत्युमुखी पडलेल्या युवकांच्या घरी सांत्वनपर भेटी-गाठी अनेकांच्या वाढलेल्या आहेत.मात्र,ते ते कुटुंब दुःखात असून त्यांचा आधारच गेल्याने त्यांचे जीवन अंधकारमय झाले आहे.तेव्हा प्रशासनाने त्वरित ठोस अशी उपाययोजना करून साह्य करावे.अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

आसगाव,ता.सातारा येथे आंबेनळी अपघात दुर्घटनेतील मृतांमध्ये रितेश राजेंद्र लोखंडे, सुहास जितेंद्र लोखंडे,अंश समीर चव्हाण याशिवाय, आदित्य अशोक साळुंखे व महेश अनिल पवार हे आसगावचे व उर्वरीत २ मर्दे व एक ड्रायव्हर खटाव तालुक्यातील होता.त्यांच्या सर्व कुटुंबांची मंत्री-महोदय, खासदार,आमदार व विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सांत्वनपर भेट घेतली आहे. मात्र,त्यांच्या कुटुंबांना अद्याप ठोस मदत मिळत नसल्याची खंतही व्यक्त करण्यात येत आहे.पालकमंत्री ना.शंभूराज देसाई,सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले खा.छ. उदयनराजे भोसले, आ.शशिकांत शिंदे आदी मान्यवरांनी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. तेव्हा प्रशासनाने त्वरित ठोस पावले उचलावीत. असेही बोलले जात आहे. त्यासाठी कार्यकर्ते पाठपुरावा करणार असल्याचाही पुनरुच्चार करीत आहेत. प्रत्यक्ष मृत कुटुंबियांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट वंचितचे नेते चंद्रकांत खंडाईत,विजय खंडाईत, शिवाजी मोरे,रमेश जाधव, ॲड.विलास वहागावकर,सतीश माने,विजय मोरे,अनिल वीर आदी विविध क्षेत्रातील लोकांनी घेतली.ती कुटुंब दुःखात असून नातेवाईकांच्या गराड्यात हंबरडा फोडत असल्याचे वेदनादायक दृश्य आजही आढळून येत आहे.

# असह्य उन्हाळ्याने सरपटणारे प्राणी शेताच्या बांधावर



शिराळा : तालुक्यात यंदाच्या वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे वन्यजीवांसह सरपटणाऱ्या प्राण्यांचेही हाल होत असून साप, घोरपड, सरडे, आदी प्राणी आता मोठ्या प्रमाणात शेताच्या बांधावर, पाणवठ्यांच्या परिसरात तसेच मानवी वस्तीजवळ दिसू लागले आहेत. दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्याने जंगलातील छोटे ओढे, झरे आणि नैसर्गिक पाणीसाठे आटू लागले आहेत. त्यामुळे पाण्याच्या आणि थंडाव्याच्या शोधात हे प्राणी ग्रामीण भागातील शेतांकडे वळत असल्याचे चित्र दिसत आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये सकाळी व सायंकाळी शेतात काम करताना शेतकऱ्यांना साप दिसण्याच्या घटना वाढल्या आहेत. विशेषतः उसाची शेती, दगडी बांध, विहिरींचा परिसर, पाण्याच्या टाक्या तसेच झाडाझुडपांच्या भागात हे प्राणी आढळत आहेत. काही गावांत नाग, धामण, घोणस यांसारखे साप दिसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुलांना शेताच्या परिसरात एकटे पाठविण्यासही पालक धजावत नाहीत. जंगलातील अधिवास कमी होणे, पाण्याची टंचाई आणि वाढते तापमान ही परिस्थिती निर्माण होण्यामागील प्रमुख कारणे आहेत.

**सर्पमित्रांकडून नागरिकांना जनजागृती करण्यात येत असून साप दिसल्यास घाबरून न जाता त्यांना मारण्याऐवजी तत्काळ सर्पमित्र किंवा वनविभागाशी संपर्क साधावा. ग्रामीण भागात मानवी आणि वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी पाणीसाठे जपण्याची गरज आहे.**

# सामाजिक न्यायाचा पाया मजबूत : ॲड.सुरेश माने

सातारा : सामाजिक क्रांतीचे जनक यांनी आरक्षणाची बीजे पेरली, तर यांनी बहुजन आरक्षणाची संकल्पना प्रत्यक्षात राबवून सामाजिक न्यायाचा पाया मजबूत केला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ तथा संविधान अभ्यासक ॲड.सुरेश माने यांनी केले. येथील यांच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती व महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. आरक्षणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका व आजची स्थिती या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सम्यक ज्येष्ठ नागरिक संघाचे बी. एल. माने होते.




ॲड. माने म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केवळ वाचणे नव्हे, तर समजून घेणे आवश्यक आहे. आज देशात सांस्कृतिक राजकारणाची गरज असताना जातीच्या राजकारणातून समाजाला दिशाभूल केली जात आहे. भगवान बुद्ध यांनी जगाला समता, करुणा आणि प्रज्ञेचा संदेश दिला. हा धम्म विज्ञान, तर्क आणि आधुनिक मूल्यांशी सुसंगत आहे. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्माच्या माध्यमातून शोषित समाजाला आत्मसन्मान आणि वैचारिक क्रांतीची दिशा दिली.

आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी २०२७ च्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर जात नोंदणीचा प्रश्न उपस्थित होत असल्याचे सांगितले. जात नोंदविल्याने आरक्षण टिकते किंवा वाढते, हा समज चुकीचा आहे. आरक्षणाचा प्रश्न हा केवळ जनगणनेशी संबंधित नसून तो सत्तासमीकरणाशी जोडलेला आहे. ५० टक्के आरक्षण मर्यादा लक्षात घेता एससी आरक्षणाच्या टक्केवारीत बदल होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. बौद्ध, आदिवासी, दलित ख्रिश्चन आणि मुस्लिम समाजासमोर जात नोंदणीचा प्रश्न गंभीर स्वरूपात उभा असल्याचे सांगत त्यांनी संविधानिक हक्कांसाठी संघर्ष सुरू ठेवण्याचे आवाहन केले. समाज परिवर्तनासाठी केवळ आरक्षण पुरेसे नाही. वैचारिक नेतृत्व, संघटनात्मक बांधणी आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारणारी नवी पिढी निर्माण होणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात बी. एल. माने यांनी संविधान विचारांवर चालणारी कार्यकर्त्यांची पिढी तयार होणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास विविध सामाजिक, धार्मिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. समितीचे कोषाध्यक्ष रमेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. चंद्रकांत खंडाईत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर सचिव माणिक आढाव यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

# सवादे येथे विजयी-पराभूत उमेदवारांचा आगळावेगळा सत्कार

उंब्रज : कराड तालुक्यातील सवादे येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील विजयी उमेदवारांचा सत्कार सोहळा तसेच कार्यकर्ता मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्य उदयसिंह पाटील उंडाळकर, जिल्हा परिषद सदस्या सौ. विजया थोरात, पंचायत समिती सदस्य नितीन थोरात, पंचायत समिती सदस्या सौ. वृषाली पाटील, सौ. स्वाती थोरात, सौ. पूजा काटवटे तसेच सवादे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमन संजय येडेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.




या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे निवडणुकीत चुरशीची लढत देऊन अल्प मतांच्या फरकाने पराभूत झालेल्या उमेदवारांचाही सन्मान करण्यात आला. मंत्री मकरंद पाटील व जिल्हा परिषद सदस्य उदयसिंह पाटील यांच्या हस्ते हा गौरव सोहळा संपन्न झाला. मंत्री मकरंद पाटील म्हणाले, प्रत्येक राजकीय पक्ष विजयी उमेदवारांचा सत्कार करतो; मात्र विजयी उमेदवारांसोबत पराभूत उमेदवारांचाही सन्मान करणारा हा आगळावेगळा उपक्रम आहे. निवडणूक ही लोकशाहीची प्रक्रिया असून पराभूत उमेदवारांनीही पक्ष आणि जनतेसाठी केलेले कार्य तितकेच महत्त्वाचे असते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ही सकारात्मक परंपरा सातारा जिल्हाभर राबविण्याचा प्रयत्न करेल.

यावेळी त्यांनी वारणा धरणाच्या बंदिस्त पाईपद्वारे पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीसाठी शासनस्तरावर विशेष प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. स्व. विलासराव पाटील यांनी वाकुर्डे बुद्रुक योजनेच्या माध्यमातून राबविलेल्या पहिल्या नदी-जोड प्रकल्पाचेही त्यांनी कौतुक केले. उर्वरित भागाला या योजनेद्वारे पाणी उपलब्ध होणार असल्याने मंजुरीसाठी मंत्रीस्तरावरील विशेष बैठक आयोजित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

जिल्हा परिषद सदस्य उदयसिंह पाटील उंडाळकर म्हणाले, स्वर्गीय विलासराव पाटील यांनी या विभागात विकासकामांचे जाळे निर्माण करत विकासातून माणसं जोडण्याचे काम केले. त्यांचा विकासाचा वारसा आम्ही पुढे नेत आहोत. वाकुर्डे बुद्रुक योजनेच्या पाण्याबरोबरच वारणा धरणाच्या बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठ्याचा सुमारे साडेसातशे कोटी रुपयांचा आराखडा तयार असून, त्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी धनाजीराव काटकर, सौ. विजया थोरात आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन थोरात यांनी केले. सूत्रसंचालन राजेंद्र जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन हेमंत थोरात यांनी मानले.

# गणेशवाडी येथे बिजपूजन कार्यक्रम उत्साहात

वडूज : भारतीय किसान संघ वर्षभर वेगवेगळे उपक्रम घेत असतो जेणेकरून किसान आपल्या शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग घेऊन आधुनिकतेकडे वाटचाल करील, असे वर्षभर उवक्रम घेतले जातात. त्यातीलच एक उपक्रम बिजपूजन हा आहे आता किसान बीज पूजन करून आपल्या शेतामध्ये लवकरच पेरणी करेल आणि त्याचे वर्षभर रुटिंग चालू होईल हा कार्यक्रम

वडूज, गणेशवाडी, ता.खटाव, जि.सातारा येथे वसुंधरा पुजन व बीजपुजन दोन जोडप्यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री विजय महाराज हे उपस्थीत होते. त्यांनी भुमी




शिंदे लोणीकर उपस्थित होते. भारतीय किसान संघ खटाव तालुका अध्यक्ष श्री सुरेश आवटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते श्री किशोर पिसाळ, अध्यक्ष, भारतीय किसान संघ सातारा सुपोषण काळाची गरज व जैवीक शेती विषयी मार्गदर्शन केले. सोबत कोषाध्यक्ष विनायक ठिगळे,मंत्री श्री संजय शिंदे, श्री चौगुले, श्री सुरेश बोराटे, सौ सपना शिंदे, सौ औटेमॅडम उपस्थीत होते.

# पाटण-पंढरपूर महामार्गाच्या कामातील महाघोटाळ्याविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## ठेकेदार आणि प्रशासनाचे साटेलोटे? कागदपत्रे दडविल्याचा गंभीर आरोप

मसूर : भ्रष्ट कारभाराविरोधात मसूरकर पेटले असून 'निकृष्ट रस्ता नको, दर्जेदार विकास हवा' अशी गर्जना करत येत्या १० जूनला राज्य महामार्गावर 'रस्ता रोको'चा एल्गार पुकारण्यात आला आहे. पाटण-पंढरपूर महामार्गाच्या कामातील महाघोटाळ्याविरोधात ग्रामस्थ कमालीचे आक्रमक झाले असून ठेकेदार आणि प्रशासनाचे साटेलोटे असल्याचा आरोप केला जात आहे. कामाची महत्त्वाची कागदपत्रे दडविल्याचा गंभीर आरोप करत मसूरकरांनी प्रशासनाला हा शेवटचा इशारा दिला आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या पाटण-पंढरपूर महामार्गाच्या कामात चाललेला प्रशासकीय सावळागोंधळ आणि ठेकेदाराची मनमानी याविरोधात आता मसूरमधील जनतेचा संयम पूर्णपणे सुटला आहे. रस्त्याच्या कामातील निकृष्ट दर्जा, उघड-उघड होणारी अनियमितता आणि जनतेला अंधारात ठेवून सुरू असलेल्या हुकूमशाही कारभाराविरोधात ग्रामस्थांनी आता थेट आरपारच्या लढाईचे हत्यार उपसले आहे. वारंवार निवेदने देऊनही ढिम्म प्रशासनाला जाग येत नसल्याने, अखेर बुधवार, दि. १० जून रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता मसूरच्या ऐतिहासिक जुन्या चौकात लोकशाही मार्गाने रस्ता रोको आंदोलन करण्याचा सज्जड निर्धार ग्रामस्थांनी केला आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या तीव्र आणि कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीला संपूर्णपणे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि मुजोर ठेकेदारच जबाबदार असेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या महामार्गाच्या कामात सुरुवातीपासूनच पारदर्शकतेचा बोजवारा उडाला असून अधिकारी नक्की कोणाचे हितसंबंध जपत आहेत, असा संतप्त सवाल आता मसूरचे नागरिक विचारत आहेत. कामाचा नेमका दर्जा काय, रस्त्याचे रुंदीकरण नेमके किती होणार, गटर्सची रचना कशी आहे आणि मुरुमाचे किती थर दिले जात आहेत, या संदर्भात मंजूर झालेला अधिकृत आराखडा आणि टेंडरची कागदपत्रे पाहण्याचा अधिकार प्रत्येक करदात्या नागरिकाला आहे. मात्र, ही कागदपत्रे मुद्दाम दडवून ठेवण्यामागे नक्की काय काळं-बेळं आहे, अशी शंका घेतली जात आहे. प्रशासनाने ग्रामस्थांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रयत्न चालवला आहे. यापूर्वी जेव्हा आंदोलनाचा इशारा दिला होता, तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी घाईघाईने बैठक घेतली होती. त्या बैठकीत त्यांनी स्वतः आपल्या चुका मान्य केल्या होत्या आणि एस्टिमेट, टेंडर कॉपी, वर्क ऑर्डर तसेच स्टील डिझाईनची कागदपत्रे देण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, या घटनेला दोन महिने उलटून गेले तरी प्रशासनाने एक साधा कागदही जनतेसमोर ठेवलेला नाही, हा मसूरकरांच्या विश्वासाला गेलेला मोठा तडा आहे. तसेच सोनाई इन्फ्रा कंट्रक्शन चे ठेकेदार यांना ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार निकृष्ट कामाचा दर्जा सुधारण्यासंदर्भात ग्रामस्थांच्या समोरच इशारा दिला होता

दोन महिने बंद राहिलेले काम पुन्हा सुरू झाले खरे, पण ठेकेदाराची नियत आणि कामाची पद्धत यात काडीचाही फरक पडलेला नाही. रस्त्याची खुदाई केल्यानंतर नियमानुसार मुरुमाचे योग्य थर देणे बंधनकारक असताना, केवळ एकदाच मुरूम टाकून थातूरमातूर सपाटीकरण केले जात आहे. मुरुमाच्या थरांची जाडी किती, त्यात निकृष्ट मातीचा वापर केला जातोय का, याबाबत कोणतीही माहिती देण्यास ठेकेदार तयार नाही. तसेच रस्त्याचे रुंदीकरण करताना दोन्ही बाजूंना समान अंतर न ठेवता काम सुरू आहे, तर गटर्सची मोजमापे ही भविष्यातील पाण्याचा निचरा करण्यासाठी पुरेशी आहेत का, याबाबत नागरिकांमध्ये मोठा संभ्रम आहे. या सर्व बाबींवरून हे काम केवळ सरकारी निधी लाटण्याचा प्रकार सुरू असल्याचा संशय बळावला आहे.

दि १० जूनच्या आंदोलनापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ या प्रकरणात हस्तक्षेप करावा, रस्त्याचा संपूर्ण आराखडा आणि सर्व कायदेशीर कागदपत्रे जनतेसमोर खुली करावीत, तसेच जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद प्रशासन आणि वरिष्ठ दक्षता पथकाच्या देखरेखीखालीच या रस्त्याचे काम पारदर्शक पद्धतीने पूर्ण व्हावे, अशी मागणी करण्यात आली आहे. वारंवार प्रत्यक्ष भेटी घेतल्या, कायदेशीर मार्गाने निवेदने दिली, वृत्तपत्रांमधून प्रशासनाचे वाभाडे काढले, पण बहिऱ्या प्रशासनाला जाग आली नाही. त्यामुळे आता बुधवार, १० जून रोजी सकाळी ११ वाजता मसूरचा जुना चौक रस्ता रोको आंदोलनाने दणाणून सोडण्याचा निर्धार युवकांनी आणि ग्रामस्थांनी केला असून निकृष्ट काम कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही, हा मसूरकरांचा अंतिम इशारा दिला आहे.

**भ्रष्ट महाघोटाळे विरोधात मसूरकरांचा शेवटचा इशारा...!**

**आम्हाला मसूरच्या विकासासाठी रस्ता हवाच आहे, पण तो पुढची ५० वर्षे टिकणारा, मजबूत आणि सुरक्षित हवा, कोणाच्या खिशात मलिदा घालण्यासाठी मसूरच्या भविष्याचा बळी दिला जाऊ देणार नाही, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला असून अनेकदा तक्रार करूनही सातत्याच्या भ्रष्ट कारभाराविरोधात मसूरकर पेटले आहेत त्यांनी आता 'निकृष्ट रस्ता नको, दर्जेदार विकास हवा'; १० जूनला महामार्गावर 'रस्ता रोको'चा एल्गार केला आहे यामुळे पाटण-पंढरपूर महामार्गाच्या कामातील महाघोटाळ्याविरोधात ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत ठेकेदार आणि प्रशासनाचे साटेलोटे? आणि कागदपत्रे दडविल्याचा गंभीर आरोप, असून मसूरकरांचा शेवटचा हा इशारा आहे**

# महापुरुषांच्या जयंतीनिमित्त वैज्ञानिक प्रयोगाद्वारे मिरजेत प्रबोधन





सातारा : महापुरुषांच्या संयुक्त जयंतीनिमित्त मिरजे,ता.खंडाळा येथे अंधश्रद्धा निर्मूलनवर प्रबोधनपर कार्यक्रम मिलिंद सेवा मंडळ आणि जयंती कमिटी यांनी आयोजित केला होता.वैज्ञानिक प्रयोगाद्वारे अनोखे असे अभिवादन करण्यात आले.ग्रामस्थांनी प्रचंड असा प्रतिसाद दिला.

महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या भोंदू बाबांच्या सुळसुळाटामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व होते. जिवंत कोंबडीला संमोहित करून विविध प्रात्यक्षिकांसह भोंदू बाबांच्या सर्व दैवी चमत्कारांचा पर्दाफाश यावेळी करण्यात आला. त्यामागे हात चलाखी आणि विज्ञान समजून सांगण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमांमध्ये प्रशांत पोतदार, राजेश पुराणिक, ध्रुव जाधव आणि वीर पोतदार यांनी कृतिशील सहभाग घेतला.

सायंकाळी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.त्यामुळे वैज्ञानिक प्रयोगांचे कार्यक्रम उशिरा सुरू झाल्याने रात्री उशिराच समारोप कारण्यात आला. मिरजे गावचे पुनर्वसित ग्रामस्थ ॲड.विलास वहागावकर,छाया विलास वहागावकर,ग्रामस्थ, बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर व मान्यवरांनी विहारात जाऊन बुद्ध मूर्तीस व डॉ.आंबेडकर प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

मिरवणूक व मान्यवरांच्या मनोगतानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचेवतीने प्रशांत पोतदार व सहकारी यांनी मनोरंजनपर हसतखेळत प्रबोधन केले.यावेळी भूषण कडाळे,शेखर कडाळे, उपसरपंच समित कडाळे, रमेश कडाळे, सुनील भिकाजी कडाळे,दीपक कडाळे,दीपक गायकवाड आदींनी अथक असे परिश्रम घेतले.

# मलकापूर नगरपरिषदेच्या पाणी दरवाढीला शिवसेना ठाकरे गटाची तीव्र हरकत

## दर कपात व सुधारणा करण्याची मागणी



मलकापूर : मलकापूर नगरपरिषदेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या पाणी दरवाढीला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र हरकत नोंदवत, सदर दरवाढ तातडीने मागे घेऊन सुधारित दर लागू करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात मुख्याधिकारी मलकापूर नगरपरिषद यांना निवेदन सादर करण्यात आले असून, वाढीव दरांमुळे सर्वसामान्य व मध्यमवर्गीय नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

५ मे २०२६ रोजी झालेल्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ११ अन्वये पाणी दरवाढीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, विविध स्लॅबमधील दरवाढ अन्यायकारक असल्याचा आरोप करण्यात आला आहे. १८० LPCD वापरासाठी प्रति हजार लिटर १४ रुपये व २२५ LPCD वापरासाठी प्रति हजार लिटर १९ रुपये असे प्रस्तावित दर जाहीर करण्यात आले आहेत. मात्र हे दर अमान्य असल्याचे सांगत, १४ रुपयांऐवजी १३ रुपये व १९ रुपयांऐवजी १७ रुपये अशी सुधारित कपात करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, नगरपरिषदेने पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी पुढील उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. यामध्ये गॅस पाईपलाईन व केबल खुदाईमुळे झालेल्या पाणीपुरवठा पाईपलाईनच्या गळतीची तातडीने दुरुस्ती करणे, PLC व SCADA तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक जलव्यवस्थापन प्रणाली विकसित करणे, सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करून वीजबचत करणे, तसेच मनुष्यबळाला प्रशिक्षण देऊन त्याचा पूर्ण क्षमतेने वापर करणे यांचा समावेश आहे.

याशिवाय कोयना पाणी करामध्ये सवलत मिळवण्यासाठी संबंधित प्राधिकरणाकडे प्रयत्न करावेत, ऑनलाइन पेमेंट सुविधा उपलब्ध करून द्यावी, वेळेत पाणी बिल भरणाऱ्या ग्राहकांना १० टक्के सवलत कायम ठेवावी, तसेच आंतरराष्ट्रीय मानकांनुसार दर्जेदार व अखंड पाणीपुरवठा सेवा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या मागण्यांचा गांभीर्याने विचार न झाल्यास नगरपरिषदेविरोधात आंदोलनात्मक भूमिका घेतली जाईल व निदर्शने करण्यात येतील, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

नगरपरिषदेने या हरकती व सूचनांवर सकारात्मक विचार करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# शेकडो प्रमुख देवस्थानांचा कायद्याच्या विरोधात रणशिंग!

पुणे : देवस्थानांच्या जमिनी वाचल्या तरच मंदिरे आणि आपले धर्मकार्य सुरक्षित राहील, त्यामुळे सरकारने या जमिनी अधिग्रहित करण्याचे काम तात्काळ थांबवावे, असा ठाम व स्पष्ट इशारा देत भीमाशंकर ज्योतिर्लिंग देवस्थान आणि अष्टविनायक समितीसह पुणे पंचक्रोशीतील शेकडो प्रमुख देवस्थानांनी 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन (प्रारूप) अधिनियम, २०२६' या कायद्याच्या विरोधात पुण्यातून थेट रणशिंग फुंकले आहे. या जाचक कायद्याला कडाडून विरोध करण्यासाठी आणि सरकारला वेळेत पावले उचलण्याची चेतावणी देण्यासाठी मंदिर महासंघाच्या वतीने पुण्यात महत्त्वपूर्ण बैठका पार पडल्या.

या कायद्याविरोधात पुढील २५ दिवसांत लाखो कायदेशीर हरकती नोंदवण्यासह, राज्यभर व्यापक स्वाक्षरी अभियान, प्रत्येक मंदिरात महाआरती, आगामी पावसाळी अधिवेशनादरम्यान विधिमंडळावर 'घंटानाद आंदोलन' आणि गरज पडल्यास मुंबईच्या आझाद मैदानावर 'महाआंदोलन' छेडण्याचा, तसेच लवकरच 'राज्यस्तरीय देवस्थान भूमी संरक्षक परिषद' आयोजित करण्याचा एकमुखाने निर्धार करत मंदिर विश्वस्तांनी मैदानात उतरण्याची घोषणा केली आहे. पुण्यातील श्री सिद्धिविनायक मंदिर (सारसबाग), खंडोबा मंदिर (आकुर्डी) आणि श्री सियाराम मंदिर, गोशाळा (हडपसर) येथे पार पडलेल्या या बैठकांमध्ये ज्येष्ठ अधिवक्ता एस. के. जैन यांनी, देवस्थानांचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांच्या जमिनी सुरक्षित राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

माजी धर्मादाय आयुक्त दिलीप देशमुख यांनी या कायद्यामागील शासनाचा हेतू संशयास्पद वाटत असल्याचे सांगत विश्वस्तांना जास्तीत जास्त हरकती नोंदवण्याचे आवाहन केले. तसेच, रांजणगाव महागणपती देवस्थानचे विश्वस्त डॉ. तुषार पाटील पाचुंदकर यांनी अष्टविनायक मंदिरांचा या कायद्याला तीव्र विरोध दर्शवला, तर भीमाशंकर देवस्थानचे अधिवक्ता सुरेश कौदरे यांनी सेवाधार्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची मागणी केली.

मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी हा लढा मंदिरांच्या अस्मितेचा असल्याचे सांगत २ जून रोजी विभागीय आयुक्तांना निवेदन देऊन राज्यभर आंदोलनाचा श्रीगणेशा केला जाईल, अशी चेतावणी सरकारला दिली.

या आंदोलनाची रणनीती निश्चित करण्यासाठी आणि प्रत्येक मंदिरात जनजागृतीचे फलक लावून व्यापक लोकचळवळ उभी करण्यासाठी राज्यभरातील प्रमुख विश्वस्त एकवटले आहेत. या बैठकांना भीमाशंकर देवस्थानचे कार्याध्यक्ष मधुकर गवांदे, प्रसाद गवांदे, ग्रामदैवत कसबा गणपतीच्या संगीताताई ठकार, भवानीपेठ पालखी मंदिराचे प्रमोद बेंगरूट, कानिफनाथ मंदिराचे ज्ञानोबा व सुरेश फडतरे, श्रीमंत सरदार खासगीवाले लिमये, निलेश वाळावे (शिरवळ), निवृत्ती बडदे (कोडीत), अखिल मंडई गणेशोत्सव मंडळाचे वांजळे, जेजुरी मार्तंड देवस्थान व दगडूशेठ दत्त मंदिरचे अधिवक्ता थोरवे, आकुर्डी खंडोबा देवस्थानचे अध्यक्ष विठ्ठल काळभोर व उपाध्यक्ष पंढरीनाथ काळभोर, तसेच चतुःश्रृंगी देवस्थानचे ट्रस्टी आणि अधिवक्ता वृषाली दातार यांसह विधी व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैसे हरवलेलेल्या भाविक परिवाराला मदतीचा हात



जेजुरी : श्रीक्षेत्र जेजुरी येथे माणुसकीचे दर्शन घडवणारी एक हृदयस्पर्शी घटना घडली. अचानक झालेल्या पावसामुळे गड परिसरात भाविकांची मोठी धांदल उडाली. याच गोंधळात नागपूरहून दर्शनासाठी आलेल्या एका भाविकाचे पैसे हरवले.सोबत लहान मुले परिवार त्यामुळे परतीच्या प्रवासाची व कुटुंबाच्या खर्चाची कोणतीही व्यवस्था नसल्याने संबंधित भाविक आणि त्याचे कुटुंब चिंतेत सापडले. ही बाब तेथील कर्मचारी आणि गुरव पुजारी वर्गाच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्परता दाखवत आपापसात वर्गणी गोळा केली. जमा झालेली रक्कम त्या भाविकाला देऊन त्याच्या परतीच्या प्रवासाची तसेच वाटेत जेवणाची व्यवस्था करून दिली. या मदतीमुळे भाविकाला मोठा दिलासा मिळाला. एकीकडे विविध कारणांमुळे जेजुरीचे नाव चर्चेत असताना, दुसरीकडे पुजारी आणि कर्मचारी वर्गाने दाखविलेल्या या माणुसकीच्या भावनेने जेजुरीची सकारात्मक बाजू समाजासमोर आणली आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून अनेकांकडून या कार्याचे कौतुक केले जात आहे. सोशल मीडियावर हा व्हिडिओ पाहिल्यानंतर भारतीय जनता पक्ष यांनी या उपक्रमाची दखल घेत पुजारी वर्ग आणि कर्मचारी वर्गाचा लेखी अभिनंदनपत्र देऊन सत्कार केला.

**नागपूरच्या भाविकाला दिलासा**

यावेळी भाजप जेजुरी शहरचे सरचिटणीस सदानंद बारकाई, सचिन मोरे, स्वानंद अत्रे उपस्थित होते. तसेच ट्रस्टचे कर्मचारी दादा खोमणे, बाबा खोमणे, कल्याण चव्हाण, आशिष जावळेकर आणि पुजारी वर्गातील संतोष बारभाई, दत्ताकाका सातभाई, अनिरुद्ध आगलावे, सचिन भोसले, प्रशांत बारभाई आदी मान्यवर उपस्थित होते. देवस्थान केवळ श्रद्धेचे केंद्र नसून माणुसकीची शिकवण देणारे स्थान आहे, याची प्रचिती या घटनेतून पुन्हा एकदा आली. पुजारी आणि कर्मचारी वर्गाने केलेल्या या मदतीबद्दल भाविकांसह नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# हिंदकेसरी पै.महेंद्र गायकवाड यांचा जंगी सत्कार



उंडाळे : मानाचा हिंदकेसरी किताब पटकावून महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रात नवे विक्रम प्रस्थापित करणारे हिंदकेसरी तथा ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. महेंद्र गायकवाड यांनी साळशिरांबे (ता. कराड) येथील ज्येष्ठ कुस्ती संघटक पै. तानाजी चवरे (आप्पा) यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या निमित्ताने कराड तालुक्यातील कुस्तीप्रेमी, पदाधिकारी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पै. महेंद्र गायकवाड यांचा उत्साहपूर्ण जंगी सत्कार करण्यात आला.

हिंदकेसरी हा अत्यंत प्रतिष्ठेचा किताब मिळवून कुस्ती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले तसेच त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कराड तालुका कुस्ती संघ, कला-क्रीडा व सांस्कृतिक ट्रस्ट, कराड तालुका कुस्ती संघटना तसेच चवरे परिवार, साळशिरांबे यांच्या वतीने आयोजित या सत्कार समारंभात पै. महेंद्र गायकवाड यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या कठोर मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावामुळे मिळालेल्या या यशाचा संपूर्ण महाराष्ट्रातील कुस्तीप्रेमींना अभिमान असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या प्रसंगी महाराष्ट्र चॅम्पियन पै. संदीप रासकर (कडेगाव), मा. सुरेश पाटील, दादा बंडा नाना पाटील, पै. आनंदा चवरे, मा. सागर विभुते, मा. शिवाजीराव पाटील, मा. दत्तात्रय क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचे स्वागत पै. प्रतीक चवरे यांनी केले.

# सिद्धिविनायक ट्रस्ट आगाशिवनगरकडून गौरव

## विद्यार्थ्यांच्या यशाला कौतुकाची थाप हवी : सौ.विद्याताई मोरे



आगाशिवनगर : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सिद्धिविनायक ट्रस्ट, आगाशिवनगर यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना विशेष प्रमाणपत्र व भेटवस्तू प्रदान करून त्यांच्या मेहनत, सातत्य, जिद्द आणि गुणवत्तेचा यथोचित सन्मान करण्यात आला.

अखिल भारतीय पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षा सौ. विद्याताई मोरे यांच्या हस्ते श्री गणेश पूजन व आरती करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्याची औपचारिक सुरुवात करण्यात आली. सौ. विद्याताई मोरे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार, सामाजिक जाणीव आणि सकारात्मक विचार आत्मसात करणे गरजेचे असल्याचे सांगितले. यश मिळवण्यासाठी सातत्य, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालक व शिक्षकांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सिद्धिविनायक ट्रस्टचे अध्यक्ष अतुल पवार, प्रा. बी. ए. पाटील, अरुण काळे, न्यू इंग्लिश स्कूलचे सचिव साळुंखे उपस्थित होते. नियोजन दत्ता गणेशकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उत्कर्ष लोहार, अक्षय पवार, गणेश चव्हाण, अंजली रैनाक, अनिता पवार, राजश्री पवार, स्मिता पाटील, अंजली हडपद, शिवानंद मालगे यांनी विशेष परिश्रम घेतले.